# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## वार्षिक अहवाल
## २००६ - २००७

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## सहावा वार्षिक अहवाल

## (एप्रिल, २००६—मार्च, २००७)

वाय २२६७—१

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| प्रस्तावना .. .. .. | (पाच) |
| १ प्रारंभिक .. .. .. | १ |
| २ आयोगाने हाताळलेली प्रकरणे .. .. .. | २ |
| ३ तक्रारींचे स्वरूप .. .. .. | २ |
| ४ आयोगाने स्वतः दखल घेतलेली प्रकरणे .. .. | ४ |
| ५ निकाली प्रकरणांचे पृथक्करण .. .. .. | ४ |
| ६ उपसमिती .. .. .. | ५ |
| ७ उपसमितीद्वारे निरीक्षण आणि शिफारस .. .. .. | ६ |
| ८ प्रशासकीय आणि तांत्रिक पाठबळ .. .. .. | ७ |
| ९ निवडक उदाहरणात्मक प्रकरणे .. .. .. | ८ |

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग सन २००१ मध्ये कार्यरत झाल्यापासून आपला ६ वा वार्षिक अहवाल सादर करीत आहे. मूलभूत मानवी हक्कांचे संरक्षण करण्याचे प्रमुख ध्येय पूर्ण करण्याचा प्रयास आयोग करीत आहे. मानवी हक्कभंगाच्या तक्रारींबाबत तपास व चौकशी करण्याचे परिपूर्ण अधिकार आयोगास आहेत. लोकहित ही मुख्य बाब असल्याने, सरकारी सेवकांद्वारे नागरिकांच्या मानवी हक्कांचा भंग झाल्यास आयोगाने सु-मोटू (स्वयं खुद्द) दाखल करून लोकांना मदत करण्यास नेहमी पुढाकार घेतलेला आहे. मानवी हक्कांचा सन्मान होण्यासाठी आयोग प्रेरणा देत आहे.

भारतीय राज्यघटना, कलम २२ अन्वये विवक्षित प्रकरणी अटक व स्थानबद्धंता यापासून संरक्षण करण्याचा अधिकार बहाल करण्यात आलेला आहे, त्या अनुषंगाने नागरिकांचे व्यक्तिगत स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि मूलभूत मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी परिपूर्ण संविधानिक तरतुदींचा शोध घेत आहोत.

सध्याचे सदस्य यांनी सन २००६-२००७ च्या शेवटी आणि मा. अध्यक्ष यांनी सन २००७-२००८ मध्ये आयोगाची सेवा धारण केलेली आहे, त्यानंतर प्रस्तूत अहवालाचे अपूर्ण काम अग्रक्रमाने पूर्ण करून अहवाल सादर करण्यात आला आहे.

**न्यायमूर्ती श्री. क्षितीज व्यास**

अध्यक्ष

| न्यायमुर्ती श्री. व्ही. जी. मुनशी | श्री. टी. सिंगारवेल | श्री. सुभाष लाला |
|---|---|---|
| सदस्य | सदस्य | सदस्य |

स्थळ : मुंबई

दिनांक ९ सप्टेंबर २००९.

(शा.म.मु.) वाय २२६७–२ (१,०००–३-२०१०)

## प्रकरण १

**प्रारंभिक :**

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, संविधानिक मंडळ असून लोकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्याचा उद्देश व हेतू बाळगून, नेमलेले आहे.

१.२ " मानवी हक्क " म्हणजे व्यक्तिगत जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठा संबंधीचे हक्क, जे राज्यघटनेने प्रदान केलेले आहेत, जे आंतरराष्ट्रीय विद्वत सभेमध्ये मिळालेले आहेत, ज्यांची अंमलबजावणी भारतीय न्यायालयाद्वारे केली जाते.

१.३ सरकारी सेवकांद्वारे मानवी हक्कांचे उल्लंघन होऊ नये या करता आयोग प्रयास करीत आहे, तसेच पवित्र वृत्तीने प्रतिबंध, संरक्षण, संवर्धन ही तीन तत्वे बाळगून आहे.

१.४ राज्यघटनेने जतन केलेल्या मानवी हक्कांच्या प्रती, सरकारी सेवकाने निष्काळजीपणा दाखविणे किंवा लोकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणे, अशा परिस्थितीत लोकांना आयोगाकडून मदत मिळते.

१.५ आयोग आपल्या सामर्थ्याची खात्री देताना तक्रारींमध्ये स्वतः पुढाकार घेऊन किंवा पिडीत व्यक्तिने किंवा तीच्या वतीने कोणत्याही व्यक्तिने विनंती अर्ज दाखल केल्यास चौकशी करतो. मानवी हक्कभंगाच्या संबंधाने कोणत्याही न्यायालयात प्रलंबीत असलेल्या कार्यवाहीत त्या न्यायालयाच्या संमतीने हस्तक्षेप करतो. राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या ज्या कोणत्याही तुरूंगात किंवा संस्थेत उपचारासाठी, सुधारणाच्या किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनार्थ एखाद्या व्यक्तिस स्थानबद्ध किंवा ठेवून घेतलेले असेल त्या तुरूंगास किवा संस्थेस, त्या बंदीवानाच्या तेथील राहणीमानाच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी भेट देतो, आणि मानवी हक्काबाबतची साक्षरता समाजाच्या विविध घटकांमध्ये निर्माण होण्यासाठी तसेच मानवी हक्कांचे संरक्षणार्थ उपलब्ध असलेल्या मार्गदर्शक उपायांबाबत जागृती होण्याकरिता प्रकाशने, प्रसारणे, चर्चासत्र आयोजित करतात.

१.६ आयोगाच्या जबाबदारीची व्याप्ती तसेच राज्यातील लोकांच्या अपेक्षा नजरेत ठेवून, पोलीस कोठडीतील हिंसा, बलात्कार, छळ आणि मृत्यूबाबत तपासणी करण्यासाठी, तसेच पोलीस कोठडी, कारागृह व स्थानबद्धतेच्या इतर केंद्रामध्ये योग्य सुधारणा आणण्यासाठी तसेच बाल कामगार प्रथा बंद होण्यासाठी आयोग पाऊले उचलू शकतो.

१.७ मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ अन्वये दिनांक ६ मार्च २००१ रोजी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग कार्यरत झाला. ऑक्टोबर, १९९१ मध्ये पॅरिस येथील राष्ट्रीय संस्थांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत विकसित केलेली " पॅरिस तत्वे ", दिनांक ३ मार्च १९९२ रोजी संयुक्त राष्ट्रसंघ मानवी हक्क आयोग यांच्याकडून तसेच दिनांक २० डिसेंबर १९९३ रोजी संयुक्त राष्ट्रसंघ यांच्या सर्वसाधारण सभेकडून मान्यता देऊन मानवी हक्क आयोगाच्या स्थापनेस आधार दिलेला आहे.

## प्रकरण २

### आयोगाने हाताळलेल्या तक्रारी :

२.१. आयोगाचे हे ६ वे वर्ष आहे. आयोगाकडील तक्रारींचे स्वरूप पाहता आयोगाच्या कामकाजाची व्याप्ती व आलेख नक्कीच वाढलेला जाणवेल. आयोगाबाबत व त्याच्या कामाबाबत जागृती दूरपर्यंत पसरली, परिणामी आयोगाकडे समस्या घेऊन येणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे.

### ● सांख्यिकी माहिती :

२.२ यावषी म्हणजेच २००६-०७ मध्ये एकूण ५६१८ नवीन प्रकरणांची नोंद झाली. दिनांक १ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००७ पर्यंत एकूण ४६४५ प्रकरणे निकाली काढली.

२.३ यावर्षी नवीन प्रकरणांची अर्थपूर्ण वाढ झालेली नाही, यांचा संबंध आयोगातील ३ मा. सदस्यांच्या निवृत्तीमुळे रिक्त झालेल्या पदांमुळे असेल, त्यांनतर एकच मा. सदस्यांनी आयोगाचे कामकाज चालू ठेवले.

२.४ सन २००६-०७ मध्ये १४६ नवीन प्रकरणे अन्वेषन विभागाकडे पाठविली होती. गतवर्षीचे जुने ४८ प्रकरणे प्रलंबित होती. एकूण १८४ प्रकरणांपैकी ११८ प्रकरणांचा तपास होऊन ७६ प्रकरणे वर्षाअखेर शिल्लक राहिले.

२.५ यावर्षी ४ प्रकरणांची सु-मोटू (स्वय खुद्द) दखल आयोगाने घेतली

### तक्रारींचे स्वरूप :

● २.६ आयोगाने प्राप्त झालेल्या एकूण ५६१८ प्रकरणांचा पृथक्करणात्मक अभ्यास करून खालील वर्गवारीप्रमाणे विभाजन केले.

**● मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ (कार्यप्रणाली) अन्वये हाताळण्यायोग्य प्रकरणे :**

(१) पोलीस दलाविरूद्ध--पोलिसांकडून बळाचा गैरवापर, गुन्हा नोंदविण्यामध्ये कसूरी, खोट्या गुन्ह्यात गुंतवणे, गैरकायदेशीर स्थानबद्धता इत्यादी. अशाप्रकारे आरोप मुख्यतः या तक्रारींमध्ये आढळली-- **(१९९१ प्रकरणे)**

(२) स्थानिक स्वयंशासकीय संस्थांविरूध्द--ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हां परिषद, नगरपालिका, नगरसेवक यांच्या विरोधातील प्रकरणे आढळली--**(३६८ प्रकरणे)**.

(३) इतर शासकीय विभागांच्या विरूद्ध--गृहविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, समाजकल्याण विभाग इत्यादि यांच्या विरोधातील प्रकरणे या वर्गवारीमध्ये आढळली--**(३ प्रकरणे)**.

(४) अनुसूचित जाती/जमाती व इतर अल्पसंख्याक यांच्या वरील अत्याचाराबाबतच्या तक्रारी-- **(१९० प्रकरणे)**.

(५) कैद्याच्या मानवी हक्कांचे उल्लंघनाबाबतच्या तक्रारी--**(४ प्रकरणे)**.

(६) महिलांना त्रास व हिंसा याबाबतच्या तक्रारी--**(१५९ प्रकरणे)**.

- **मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ (कार्यप्रणाली) अन्वये न हाताळण्यायोग्य प्रकरणे :-**

(१) सेवाविषयक तक्रारी–(८८७ **प्रकरणे).**

(२) कौटुंबिक कलहाच्या तक्रारी–(२०१ **प्रकरणे).**


(३) जमिनीच्या वादाबाबतच्या तक्रारी–(३२५ **प्रकरणे).**

(४) खाजगी व्यक्तीविरूद्ध तक्रारी–(५५४ **प्रकरणे).**

(५) खाजगी नोकरीवर ठेवणारे मालक व कामगारांशी संबंधीत असलेल्या तक्रारी व इतर–(४७ **प्रकरणे).**

(६) संकीर्ण स्वरूपाच्या तक्रारी–(७०९ **प्रकरणे).**

संकीर्ण स्वरूपाच्या तक्रारींमध्ये बँक, वसुलीदार, शैक्षणिक संस्था, वैद्यकीय निष्काळजीपणा आणि इतर यांचा समावेश आढळला. तक्रारींच्या वर्गवारीचे विभाजन खालील तक्त्यानुसार दाखविले आहे :—




२.७ ही खरोखरच धक्कादायक बाब आहे की, आयोगाने हाताळलेल्या प्रकरणांपैकी जास्तीत जास्त प्रकरणे पोलीस दलाविरूद्ध आहेत. या वस्तुस्थितीची दखल गांभिर्याने घेऊन पोलीस दल व जिल्हा प्रशासन यांच्यासाठी “ मानवी हक्क ” बाबत प्रशिक्षण व जागृतीच्या कार्यक्रमाचे नियोजन केले.

२.८ तसेच आयोगाकडे कायद्यान्वये न हाताळता येणारी प्रकरणे सुद्धा मोठ्या प्रमाणावर प्राप्त झाली, यावरून आयोगाचे अधिकार व कार्य याबाबत जनमानसात माहितीची उणीव असल्याचे दिसून येते. जनजागृतीसाठी आयोगाचे मा. सदस्य यांनी जिल्हास्तरावर भेटी, व्याख्याने व प्रकरणांची सुनावणी करून या समस्येवर उपाय करण्याचे पाऊले उचलली आहेत.

**• आयोगाने (स्वयं खुद्द) दखल घेतलेली प्रकरणे**

२.९ आयोग स्वतः काही प्रकरणांमध्ये दखल घेतात. या वर्षी मा. सदस्य यांच्या जागा रिक्त असल्याने आयोगाकडून स्वतः दखल घेण्याची प्रकरणांची संख्या गतवर्षी आयोगाकडून स्वतः दखल घेतलेल्या २६ प्रकरणांच्या संख्येपेक्षा कमी ठरली. यावर्षी आयोगाने खालील प्रकरणांमध्ये स्वतः दखल घेतलेली आहे :–

(१) खैरलांजी प्रकरण, ज्यामध्ये श्री. भैयालाल भोतमांगे या दलित शेतकऱ्याच्या कुटुंबातील ४ सदस्यांची कत्तल सवर्ण जातीतील लोकांनी केली. या प्रकरणामध्ये पोलिसांच्या निष्क्रीयतेवर ठपका ठेवण्यात आल्यामुळे आयोगाने स्वतः सदर प्रकरणाची दखल घेऊन संबंधीत अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविला.

(२) नागपूर येथील मेयो रूग्णालयाच्या आवारात एक स्त्री अर्धचेतनावस्थेत पडलेली असताना तीच्या नवजात शिशूला रस्त्यावरील कुत्र्याने हल्ला करून ठार केले, याबाबतचे प्रकरण.

(३) डेव्हिड ससून रूग्णालयामध्ये क्षयरोग झालेल्या रोग्यास जागेच्या अभावी जमिनीवर झोपण्यास भाग पाडले, याबाबतचे प्रकरण.

(४) मुंबईमधील नायर दंत महाविद्यालयामध्ये प्रवेशद्वाराच्या कमानीवरील छताचा सिमेंटचा भाग कोसळून त्याखाली चिरडून मजूर कर्मचारी मृत झाला, याबाबतचे प्रकरण.

**• निकाली प्रकरणांचे पृथक्करण**

यावर्षी आयोगाने निकाली काढलेल्या प्रकरणांचे पृथक्करण खालीलप्रमाणे करण्यात आलेले आहे :–

२.१० यावर्षी एकूण ४६४५ तक्रारी निकाली काढल्या. ३९४२ प्रकरणे कार्यशक्तीमध्ये नसल्याने निकाली काढले. ६८२ प्रकरणे संबंधीत अधिकारी मंडळीकडून अहवाल प्राप्त करून आणि सुनावणी घेऊन निकाली काढले.

२.११ प्रकरणांमध्ये आयोगाने शिफारस/मदत सुचविली आहे.

**• कोठडीतील मृत्यू प्रकरणे :**

यावर्षी कोठडीतील मृत्यूबाबत एकूण १८७ प्रकरणांची माहिती आयोगास प्राप्त झाली. त्यापैकी १२७ प्रकरणे आयोगाने निकाली काढलेली आहेत.

## प्रकरण ३

**● उपसमिती**

मानवी हक्क म्हणजे मानवाचे जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठा या संबंधाने राज्यघटनेने बहाल केलेले अधिकार होय, ज्यांना आंतरराष्ट्रीय विद्वतसभेमध्ये मूर्तस्वरूप देण्यात आलेले आहे आणि ज्यांची अंमलबजावणी भारतीय न्यायालयाद्वारे केली जाते.

३.२ कायद्यान्वये प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज, न्यायालयाकडून शिक्षा झालेला गुन्हेगार, स्थानबद्ध व अटकेत असलेला बंदी, यांचे संविधानाच्या कलम २१ अन्वये हमी दिलेले महत्त्वाचे अधिकार नाकारता येऊ शकत नाही. कोणत्याही प्रकारची क्रुरता किंवा अमानवीय वर्तणूक राज्यघटनेच्या कलम २१ च्या कक्षेत येत नाही, मग ते चौकशी करतेवेळी किंवा विचारपूस करतेवेळी असो.

३.३ अटक केलेल्या व्यक्तीच्या हक्कांची खात्री व संरक्षण करण्याच्या दृष्टीने मा. सर्वोच्च न्यायालयाने डी.के.बसू विरूद्ध पश्चिम बंगाल राज्य सर्वोच्च न्यायालय ए आय आर 610 या प्रकरणामध्ये ११ मार्गदर्शक तत्त्वे निर्देशित केली.

३.४ या ११ मार्गदर्शक तत्त्वांचे पालन योग्य होण्यासाठी आणि योग्य पाऊले उचलण्याच्या दृष्टीकोनातून मानवी हक्क आयोगाने उपसमिती नेमावी असेही निर्देशित केले.

## प्रकरण ४

### • उपसमितीद्वारे निरीक्षण आणि शिफारस

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनानुसार उपसमितीने विविध पोलीस ठाण्यांना आकस्मिक भेटी दिल्या.

४.२ यावर्षी उपसमितीद्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे पोलीस ठाण्यांना भेटी देऊन पोलीस अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या :—

| अनुक्रमांक (१) | दिनांक (२) | पोलीस ठाणे (३) | जिल्हा (४) |
|---|---|---|---|
| १ | १ मे २००६ | मोर्शी पोलीस ठाणे | अमरावती |
| २ | २ मे २००६ | चांदूरबाजार पोलीस ठाणे | अमरावती |
| ३ | ३१ मे २००६ | नवलपेठ पोलीस ठाणे | परभणी |
| ४ | १ जून २००६ | बुटीबोरी पोलीस ठाणे | नागपूर ग्रामीण |
| ५ | २ जून २००६ | तालुका पोलीस ठाणे | नागपूर शहर |
| ६ | ९ जून २००६ | शहर पोलीस ठाणे | चंद्रपूर |
| ७ | १० जून २००६ | बल्लारपूर पोलीस ठाणे | चंद्रपूर |
| ८ | ३ फेब्रुवारी २००७ | मध्यवर्ती कारागृह | परभणी |

४.३ उपसमितीद्वारे पोलीस ठाण्यांना भेटी देऊन तेथील अटक नोंदवही आणि इतर नोंदवह्या यांची तपासणी करण्यात आली. अटक व्यक्तीची माहिती त्याच्या नातेवाईकांना देण्यात आली का? अटक व्यक्तींची वैद्यकीय तपासणी २४ तासांमध्ये केली का? या बाबी तपासण्यात आल्या. अटकेची नोंद ठाणे दैनंदिनीमध्ये तात्काळ करणे, अटक पंचनामा योग्यप्रकारे तयार करणे याबाबत पोलीस प्रभारी यांना सूचना देण्यात आल्या. अटक व्यक्तीस २४ तासांच्या आत दंडाधिकारीसमोर सादर करण्यासंबंधीच्या सूचना सुद्धा उपसमितीद्वारा देण्यात आल्या, त्याचबरोबर इतर काही संबंधीत सूचनाही देण्यात आल्या.

४.४ मा. सर्वोच्च न्यायालयाद्वारे देण्यात आलेल्या ११ मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणीबाबतचा तिमाही अहवाल राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षक यांच्याकडून उपसमिती प्राप्त करीत आहे.

## प्रकरण ५

### ● प्रशासकीय आणि तांत्रिक पाठबळ

महाराष्ट्र शासनाने, त्याच्या शासन निर्णय क्र. एच आर सी- १०९९/३७८/पोल-१४, दिनांक १५ जानेवारी २००० नुसार महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग स्थापन केले. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ६ मार्च २००१ रोजी अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीबाबत अधिपत्र जारी केल्यानंतर, पहिला राज्य मानवी हक्क आयोग कार्यान्वित झाला. त्यानुसार अध्यक्ष आणि सदस्य यांनी आयोगामध्ये आपआपल्या पदाचा कार्यभार धारण केला.

५.२ न्यायमूर्ती अे.डी.माने दि. २१ मार्च २००६ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर आयोगामधील अध्यक्ष हे पद रिक्त झाले. यावर्षीच्या अखेरपर्यंत हे पद रिक्त राहिले. न्यायमूर्ती श्री. व्ही. जी. मूनशी, श्री. टी. सिंगारवेल आणि श्री. सुभाष लाला यांनी वर्ष अखेरीस सदस्य या पदाचा कार्यभार स्वीकारला.

### ● कर्मचारी वर्ग :

५.३ आयोगामध्ये कर्मचारी वर्ग सातत्याने ३ शाखांमध्ये विभाजीत झाला. त्यापैकी प्रशासन शाखेचे प्रमुख सचिव, अन्वेषन शाखेचे प्रमुख विशेष पोलीस महानिरीक्षक आणि विधी शाखेचे प्रमुख प्रबंधक आहेत.

५.४ यापूर्वी आयोगाचे सचिव श्री. अमिताभ चंद्र, भाप्रसे, हे दिनांक ३१ जुलै २००६ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर श्री. सुनील पोरवाल, भाप्रसे, यांनी काही काळ पदभार स्वीकारला. दिनांक २८ डिसेंबर २००६ पासून श्री. रमेशचंद्र सागर, भाप्रसे यांनी सचिव पदाचा कार्यभार स्वीकारला. दिनांक ६ मार्च २००७ रोजी अपर पोलीस महासंचालक श्री. पी.एन.दीक्षित, भापोसे, यांनी अन्वेषन विभाग प्रमुख पदाचा कार्यभार स्वीकारला.

### ● जागा :

५.५ महाराष्ट्र शासनाने, त्याच्या शासन निर्णय क्र. एच आर सी - १०९९/३७८/पोल-१४, दिनांक १५ जाने. २००० नुसार महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे राहील असे नमूद केलेले आहे. शासनाचे परिपत्रक क्र.जी.ए./११.०१/सी.एन.१५/२००१/२२, दिनांक २० जून २००२ अन्वये महाराष्ट्र शासनाने आयोगासाठी २३८० चौ.फूट एवढी जागा, राज्य प्रशासकीय महाविद्यालय आवार, ९, हजारीमल सोमानी मार्ग, सीएसटी समोर, मुंबई ४०० ००१ येथे वाटप केली. तत्पूर्वी सदरची जागा राज्य वित्त आयोगाच्या ताब्यात होती. सध्या ह्याच जागेत राज्य मानवी हक्क आयोग कार्यरत आहे.

### ● साधनसामग्री :

५.६ सन २००६-०७ यावर्षी राज्य शासनाने एकूण रुपये १ कोटी ४३ लाख ४ हजार एवढ्या रकमेचे अनुदान उपलब्ध केले. तथापि, यावर्षी सर्व रक्कम म्हणजेच एकूण रुपये १ कोटी ४३ लाख ४ हजार एवढी रक्कम खर्च करण्यात आली त्यापैकी एकूण रुपये ७८ लाख ४८ हजार ५८१ एवढी रक्कम वेतन व भत्ते यांवर खर्च झाली.

## प्रकरण ६

### ● निवडक उदाहरणात्मक प्रकरणे

यावर्षी आयोगाने हाताळलेल्या प्रकरणांपैकी काही उदाहरणात्मक प्रकरणे खाली नमूद केल्याप्रमाणे आहेत :-

**१. प्रकरण क्र. १४१५/१६/२००५-०६**

तक्रारदार : (स्वयं खुद्द) सु-मोटू प्रकरण

प्रतिवादी : १. महानगरपालिका आयुक्त

: २. अधिष्ठाता, नायर दंत महाविद्यालय, मुंबई.

आदेश दिनांक : ४ मार्च २००७

गणसंख्या : एक न्यायासन

**तक्रारींचे स्वरूप.—** दिनांक १३ फेब्रुवारी २००६ रोजीच्या इंडियन एक्सप्रेस, मुंबई या वर्तमानपत्रात छापलेल्या बातमीनुसार राज्य मानवी हक्क आयोगाने सु-मोटू प्रकरण दाखल केले. प्रस्तूत प्रकरणामध्ये नायर दंत महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या कमानीचे छत अंगावर पडल्याने एक मजूर दगावला.

**आयोगाची कार्यवाही.—** आयोगाने प्रतिवादी अधिष्ठाता, नायर दंत महाविद्यालय आणि महानगरपालिका आयुक्त यांचेकडून अहवाल मागविला. प्रस्तुत अहवालानुसार दिनांक १० जून २००६ रोजी संबंधित क्षेत्रातील पोलीस उपायुक्त यांनी कंत्राटदार आणि पर्यवेक्षक या दोघांवर आरोप ठेऊन त्यांना अटक केली आणि न्यायालयात हजर केले.

**आयोगाचा निर्णय.—**प्रस्तुत प्रकरणामध्ये आयोगाच्या मध्यस्थीने संबंधित कार्यालयाकडून योग्य ती कारवाई करण्यात यावी.

**२. प्रकरण क्र. २६/२९/२००५**

तक्रारदार : श्री. रविंद्र हरिश्चंद्र कासलकर

प्रतिवादी : जिल्हाधिकारी, जिल्हा सिंधुदुर्ग

आदेश दिनांक : २० डिसेंबर २००६

गणसंख्या : एक न्यायासन

**तक्रारींचे स्वरूप.—**तक्रारदाराचे वडील एकात्मिक बालविकास अधिकारी म्हणून कामाला असताना मृत झाले. त्यांच्या जागेवर नोकरी मिळविण्याचा प्रयत्न त्यांनी केला असता प्रतिवादीने नकार दिला त्यामुळे वादीने आयोगाकडे आपले गाऱ्हाणे मांडले.

**आयोगाची कार्यवाही.—**आयोगाने प्रतिवादी जिल्हाधिकारी, जिल्हा सिंधुदुर्ग यांचेकडून अहवाल मागविण्यात आला. त्यावर प्रतिवादी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी अहवाल सादर केला. अहवालात नमूद केले की, तक्रारदार हा एकत्रित कुटूंबापासून विभक्त राहतात आणि त्यांच्या भावाला वडिलांच्या जागेवर नोकरी देण्यात आलेली आहे.

**आयोगाचा निर्णय.—**प्रस्तुत प्रकरणामध्ये संबंधित प्रतिवादी यांच्या कार्यालयाकडून समाधानकारक अहवाल, माहिती प्राप्त झाल्यामुळे मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ कलम १७(१)(ब) अन्वये प्रकरण विचारात घेतले नाही.

३. **प्रकरण क्र. २४७/२३/२००५**

तक्रारदार : श्री.इब्राहिम मोहम्मद शरिफ

प्रतिवादी : पोलीस आयुक्त, पुणे

आदेश दिनांक : १२ मार्च २००७

गणसंख्या : एक न्यायासन

**तक्रारींचे स्वरूप.**—दिनांक ८ डिसेंबर २००५ रोजी ७ ते ८ पोलिसांनी जबरदस्तीने तक्रारदारास पोलीस ठाण्यात नेले. एक फौहाद नामक व्यक्तीने तक्रारदाराची सून जमावाच्या ताब्यात दिली. पोलिसांनी जबरदस्तीने तिच्या मुलास नेले व मारहाण केली. फौहाद नामक व्यक्ती तक्रारदाराच्या कुटुंबातील सदस्यांना ठार करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे तक्रारादाराचे म्हणणे आहे.

**आयोगाची कार्यवाही.**—आयोगाने प्रतिवादी पोलीस आयुक्त, पुणे यांचेकडून अहवाल मागविला. त्यानुसार प्रतिवादीने अहवाल सादर केला. त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, पोलिसांनी योग्य ती कार्यवाही तात्काळ केलेली आहे. बेपत्ता मुलीचा शोध घेण्यात आला असून तिला तिच्या वडिलांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

**आयोगाचा निर्णय.**—प्रस्तुत प्रकरणामध्ये पोलिसांकडून तात्काळ आणि योग्य कार्यवाही करून बेपत्ता मुलीचा यशस्वी शोध घेण्यात आलेला असल्याने पुढील कार्यवाही आवश्यक नाही, म्हणून प्रकरण निकाली काढले.

४. **प्रकरण क्र. ३०२/३०/२००५**

तक्रारदार : सु-मोटू प्रकरण

प्रतिवादी : (१) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

(२) पोलीस आयुक्त, नवी मुंबई

(३) हमीद नझीर राजी, पोलीस कॉन्स्टेबल नेरुळ पोलीस ठाणे

आदेश दिनांक : १५ डिसेंबर २००६

गणसंख्या : एक न्यायासन

**तक्रारींचे स्वरूप.**—पोलीस कॉन्स्टेबलद्वारा बारबालावर बलात्कारसंबंधी दिनांक १९ ऑक्टोबर २००५ रोजीच्या दि टाईम्स् ऑफ इंडिया या वृत्तपत्रामधील बातमी.

**आयोगाची कार्यवाही.**—आयोगाने प्रतिवादी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि हमीद नझीर राजी, पोलीस कॉन्स्टेबल, नेरुळ पोलीस ठाणे यांना नोटीस बजावून पीडित बारबालास तात्काळ अंतरिम मदतनिधी का देण्यात आली नाही याबाबत कारणे दाखविण्यास सांगितले. पोलिसांनी अहवाल सादर करून सांगितले की प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीस अटक, ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे ठेवलेले आहे. सदरचे प्रकरण स्त्रीची अब्रू लुटण्याबाबत असल्याचे पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी म्हटले आहे.

**आयोगाचा निर्णय.**—प्रस्तुत प्रकरणामध्ये योग्य तो तपास पूर्ण झाल्यावर पोलिसांनी आरोपींवर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

५. **प्रकरण क्र. ५६/४/२००५**

तक्रारदार : श्री. भारत दशरथ कर्डे आणि इतर

प्रतिवादी : संचालक, कारागृह, पुणे

आदेश दिनांक : १५ मार्च २००७

गणसंख्या : एक न्यायासन

**तक्रारींचे स्वरूप.**—तक्रारदार भारत दशरथ कर्डे आणि इतर यांनी तक्रार केली आहे की, कारागृहामध्ये औषध-पाणी मिळत नाही, मूलभूत सुविधा उपलब्ध नाही, करमणुकीचे साधन नाही जे कैद्यांना मिळावयास हवे आहे. तसेच तेथील अधिकारी कैद्यांशी नेहमी शिवराळ भाषेत बोलतात.

**आयोगाची कार्यवाही.**—आयोगाने प्रतिवादी संचालक, तुरुंग व कारागृहे, पुणे यांना नोटीस बजावून अहवाल मागविला प्रतिवादीने, त्यांच्यावरील आरोपांबाबत खुलासा होत नाही असे अहवालात नमूद केले आहे, परंतु नंतर तपास सुरू केला असता, आरोपांतील तथ्य त्यांना आढळून आले. त्यावर काही सुधारणा होण्याकरिता मार्गदर्शन केले असल्याचे कळविण्यात आले आहे.

**आयोगाचा निर्णय.**—कैद्यांच्या तक्रारींबाबत मध्यस्थी करून संबंधित कारागृहाच्या अधिकारी व कैदी यांच्यामध्ये समतोलपणा पुन्हा प्रस्थापित केला अशा प्रकारे प्रकरण निकाली काढले.

❑ ❑

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई